प्रकरण ४ थे

# कुंभारी गावाची माहिती

## प्रकरण ४ थे

# कुंभारी गावाची माहिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये कुंभारी गावाची माहिती घेण्यात आली आहे. हे गाव सोलापूर जिल्हयातील दक्षिण सोलापूर या तालुक्यातील एक महत्वपूर्ण असे गाव आहे. यासाठी प्रथम येथे सोलापूर जिल्हयाची थोडक्यात माहिती दिली आहे. त्याचबरोबर दक्षिण सोलापूर तालुक्याचाही थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. त्यासोबतच कुंभारी गावाची माहिती देत असताना अनेक बारीक सारीक तपशीलांचा गोषवारा देण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने अनेक मुद्दे चर्चिले आहेत. उदा. भौगोलिक, राजकीय, शैक्षणिक, आरोग्यविषयक, सांस्कृतिक इ. तत्पूर्वी सोलापूर जिल्हयासंबंधीची माहिती थोडक्यात पुढील प्रमाणे :

**सोलापूर जिल्हा :**

"सोलापूर जिल्हा हा भिमा, सीना आणि माण नद्यांच्या खोऱ्यात असून कर्नाटक राज्याच्या सीमेलगत आहे. त्याचे भौगोलिक स्थान १७°४० अक्षांश उत्तरेकडे आणि ७५°४६ पूर्व रेखांशावर असून उस्मानाबाद, अहदनगर या दुष्काळी पट्टयात येतो. सोलापूर जिल्हयाच्या आजूबाजूला सांगली, सातारा, पुणे, लातूर, उस्मानाबाद आणि विजापूर हे जिल्हे येतात. सोलापूर जिल्ह्याचा आकार अनियमित असून साधारणपणे पूर्व-पश्चिमेला ३०० कि.मी. व उत्तर-दक्षिणेला २५० कि.मी. असे त्याचे क्षेत्रफळ आहे. सोलापूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ १५०२१ चौ. कि. मी. असून २००१ च्या जनगणनेसुार सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या ३८.५५ लाख इतकी आहे."[१]

सोलापूर हे सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख केंद्र असून सोलापूर शहर भागातील सर्व राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग व जिल्हा मार्ग यांनी जोडलेला आहे. सोलापूर शहर हे पुणे -

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सोलापूर – हैद्राबाद राष्ट्रीय मार्ग क्र.९ वर दिसून येते. तसेच विजापूरकडे जाणारा राज्यमार्ग देखील सोलापूरला जोडलेला आहे. सोलापूर हे मध्यरेल्वेच्या मुंबईच्या आग्नेय दिशेला आहे. तसेच सोलापूर शहर हे मुंबईपासून ४५५ कि.मी. अंतरावर तर पुण्यापासून २६३ कि.मी. अंतरावर आणि हैद्राबादपासून ३६५ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. सोलापूर शहर हे जिल्हयाच्या मध्यभागी नसून जिल्हयाच्या कडेला आहे. सोलापूर जिल्हयाच्या पूर्वेकडील अक्कलकोट तालुका आणि दक्षिणेकडील दक्षिण सोलापूर तालुका यांच्या सीमा कर्नाटक राज्याला भिडलेल्या असून अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या तालुक्यातील बहुसंख्य गावांवर कर्नाटकी संस्कृतीचा व कन्नड भाषेचा पूर्ण प्रभाव दिसून येतो. किंबहुना सोलापूर शहर आणि दक्षिण सोलापूर, अक्कलकोट व मंगळवेढा हे भाग कर्नाटकाच्या जवळ असून त्यांच्यावर कन्नड भाषेचे व लोकजीवनाचे प्रभाव दिसून येतात. सोलापूर हे वीरशैव पंथांचे प्रमुख ठिकाण असल्याने सोलापूर शहर व दक्षिण सोलापूर या ठिकाणी वीरशैव जातीच्या कन्नड भाषिक नागरिकांचे प्रमाण मोठे आहे. वीरशैव पंथियांचे सुप्रसिध्द संत श्री. सिद्धेश्वरांचा जन्म सोलापूर मध्ये झाला. व त्यांनी तलाव खोदून पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर केल्यामुळे श्री. सिद्धेश्वर क्षेत्र म्हणून सोलापूर दक्षिणेस प्रसिद्धीस आले. तेव्हापासून कानडी व मराठी संस्कृतीचा संगम असलेले शहर आणि जिल्हा म्हणून सोलापूर ओळखले जाते. तसेच मार्शल लॉच्या काळात १२ जाने. १९३१ ला मल्लाप्पा धनशेट्टी, श्री.किशन सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे या चार हुतात्म्यास ब्रिटिशांनी फासावर चढविले, त्यामुळे सोलापूरास हुतात्म्याचे शहर असेही म्हटले जाते. याशिवाय इथला टेक्स्टाईल उद्योग विशेषत: टॉवेल, चादर यासाठी प्रसिद्ध आहे.

**दक्षिण सोलापूर तालुका :**

''सोलापूर जिल्हयात एकूण अकरा तालुके असून त्यातील दक्षिण सोलापूर हा एक महत्वपूर्ण तालुका आहे. दक्षिण सोलापूर तालुक्याचे क्षेत्र ४६९.५ चौ. मैल असून या

तालुक्यात एकूण ८० खेडी आहेत. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्याची एकूण लोकसंख्या १,१२,५०४ इतकी आहे. सोलापूर जिल्हयाच्या एकूण क्षेत्रापैकी ७.९% क्षेत्र दक्षिण सोलापूर तालुक्याने व्यापले आहे. तसेच सोलापूर जिल्हयाच्या एकूण लोकसंख्यपैकी ६% लोकसंख्या दक्षिण सोलापूर तालुक्यात आहे.''[२]

दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रामुख्याने लिंगायत आणि धनगर समाजाचे प्राबल्य आहे. धनगरसमाजाचे नेते आ. आनंदराव देवकते या मतदारसंघातून सलग पाचवेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तसेच त्यांनी महाराष्ट्राचे दुग्धविकास मंत्रीपद काही काळ भूषविले होते. याशिवाय मा. सुशिलकुमार शिंदे यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवून विजय मिळवला. त्यामुळे हा तालुका मुख्यमंत्र्याचा मतदारसंघ म्हणूनही ओळखला जातो.

**कुंभारी गांव माहिती :**

**भौगोलिक :**

कुंभारी हे गांव दक्षिण सोलापूर तालुक्यातील एक महत्वपूर्ण असे गाव आहे. सोलापूर शहराच्या पूर्वेला केवळ ८ कि.मी. अंतरावर सोलापूर अक्कलकोट मार्गावर वसलेले आहे. गावामध्ये कुंभेश्वर या देवाचे मंदिर असून या ग्रामदैवताच्या नावावरूनच कुंभारी हे नाव या गावास पडले आहे.

कुंभारी गावाचे एकूण क्षेत्रफ ळ ५७४५.९५ हेक्टर इतके असून गावाची एकूण लोकसंख्या ११,२३६ (सन २००१-२००२ च्या जनगणनेनुसार) असून गावाची विभागणी एकूण ६ वार्डात झालेली आहे. गावामध्ये एकूण १७९० घरे आहेत.

कुंभारी गावाच्या दक्षिणेस कालिकादेवी पाझर तलाव असून या तलावाचे काम गावाचे पाहिले. सरपंच कै. चनबसाप्पा बिराजदार यांनी करून घेतले आहे. तसेच गावाच्या पश्चिमेस इंदिरा पाझर तलाव असून या दोन तलावामुळे गावातील सार्वजनिक विहिरी,

हातपंप यांची जलपातळी वाढण्यास त्यामुळे हातभार लागला आहे. कुंभारी पासून केवळ ७ कि.मी. अंतरावर होटगी हे गांव असून तेथे एक तलाव आहे. तसेच कुंभारी गावानजीक हणमगांव आणि रामपूर या गावालगतसुद्धा तलाव असून त्यांचे पाणलोट क्षेत्र विस्तृत आहे की ज्याचा फायदा कुंभारी गावास होतो.

कुंभारी गावापासून १० कि.मी. अंतरावरील रामूपर (ता.द. सोलापूर) येथील तलावानजीक कुंभारी गावासाठी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी विहीर खोदलेली असून तेथून जवळपास १० कि.मी. अंतरावरून पाईप लाईनद्वारे गावामध्ये (कुंभारी) उंच टाकी बांधून (५ लाख लिटर क्षमता) नळाद्वारे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे.

कुंभारी गावाची शेती विषयक माहिती पुढील तक्त्यात दाखविली आहे.

| एकूण लागवडी खालील क्षेत्र | बागायत | जिरायत | ओसाडनापीक | प्रमुख पिके |
|---|---|---|---|---|
| ५४७८.५३ हेक्टर | ३६१.८७% | ५११६.६६% | २६७.४२ | तूर, ज्वारी, गहू, कांदा, ऊस आणि हरभरा इ. |

(संदर्भ : गावकामगार तलाठी, कुंभारी ता.द.जि.सोलापूर.)

**राजकीय :**

कुंभारी ग्रामपंचायतीची निर्मिती स्वातंत्र्यपूर्व काळात १९३८ मध्ये झाली. गावाचे पहिले सरपंच म्हणून कै. चनबसाप्पा बिराजदार हे होते. तर सध्या गावच्या सरपंचपदी सौ. शारदाताई गुरूनाथ कटारे या आहेत. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत सरपंचपदी एखादी महिला विराजमान होणे ही कुंभारी ग्रामपंचायतीच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे.

कुंभारी गावामध्ये प्रामुख्याने दोन घराण्यांचा संपूर्ण गावावर आजही दबदबा आहे. ती दोन घराणी म्हणजे बिराजदार घराणे (विश्वनाथ बिराजदार) आणि दुसरे म्हणजे पाटील घराणे

(गंगाधर पाटील). कुंभारी गावात आजही या दोन कुटूंबियांना खूप मानाचे आणि आदराचे स्थान आहे. त्यामुळे कुंभारी ग्रामपंचायतीच्या सत्तेवर आलटून पालटून या दोन घराण्याचीच आजपर्यंत हुकूमत होती. परंतू २००५ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणूकीत गुरूनाथअण्णा कटारे यांचे पॅनेल विजयी झाले आणि ग्रामपंचातीची सत्ता पहिल्यांदाच बिराजदार-पाटील घराण्यापलिकडे गेली. गावात बिराजदार-पाटील घराण्याशिवाय गुरूनाथअण्णा कटारे हे सत्तेचे तिसरे केंद्र उदयास आले.

कुंभारी गावात एकूण ६ वॉर्ड असून ग्रामपंचायत सदस्य संख्या एकूण १७ आहे. याशिवाय गावात ३९६४ पुरूष तर ३७३३ स्त्री मतदार आहेत असे एकूण ७६९७ मतदार कुंभारी गावामध्ये आहेत. कुंभारी ग्रामपंचायतीची वॉर्ड निहाय मतदारसंख्या पुढीलप्रमाणे दाखवली आहे.

| वॉर्ड क्र. | बुथ क्र. | पुरूष मतदार | स्त्री मतदार | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | ७५ | ६०३ | ५८४ | ११८७ |
| २. | ७६ | ७३७ | ६७३ | १४१० |
| ३. | ७७ | ७२७ | ६७० | १३९७ |
| ४. | ७८ | ५८३ | ५६२ | ११४५ |
| ५. | ७९ | ६२६ | ६०२ | १२२८ |
| ६. | ८० | ६८८ | ६४२ | १३३० |
| ६. | ६ | ३९६४ + | ३७३३ = | ७६९७ |

(संदर्भ : २००१-२००२ मतदार यादी.)

कुंभारी गावामध्ये प्रामुख्याने लिंगायत व धनगर या जातीचे प्राबल्य असून या दोन जातींची लोकसंख्या इतरांच्या तुलनेत सर्वात जास्त आहे. त्यानंतर मुस्लिम, अनुसूचित जाती-जमाती व इतर मागास या जातीच्या लोकांची संख्या सुद्धा लक्षणीय आहे. त्यामुळेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी हे गाव राजकीयदृष्ट्या अतिशय महत्वपूर्ण आहे.

कुंभारी हा जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदारसंघ असून कुंभारी पंचायत समिती मतदारसंघातून निवडून आलेल्या कुंभारीच्या सौ. सुरेखा गुंडे यांना २००३ मध्ये दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीच्या सभापती म्हणून निवडण्यात आले. याशिवाय कुंभारी गावाचे सुपुत्र श्री. अप्पासाहेब बिराजदार हे दक्षिण सोलापूर तालुका युवक काँग्रेसचे २००३ अध्यक्ष होते. तसेच २००५ मध्ये ते कुंभारी पंचायत समिती मतदारसंघातून निवडून आले व त्याची दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समिती उपसभापती म्हणून निवड झाली होती. तसेच सद्या २००७ मध्ये आलेल्या कुंभारी पंचायत समिती मतदारसंघातून आप्पासाहेब बिराजदार यांची भावजय सौ. मिनाक्षी बिराजदार या काँग्रेस (आय) पक्षांच्या तिकीटावर निवडून आल्या असून त्यांची दक्षिण सोलापूर तालुका पंचायत समितीच्या उपसभासतीपदी निवड आली आहे.

या शिवाय कुंभारी जिल्हा परिषद मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार श्री. श्री.शैल नरोळे हे विजयी झाले. (२००७ निवडणूक ) असून त्यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या कृषी सभापतीपदी निवड झाली आहे. थोडक्तयात कोणत्याही प्रकारच्या निवडणूका असो कुंभारी गावाच्या कौलावर बरेच काही अवलंबून असते. किंबहुना या गावातील कौल या निवडणुकांसाठी निर्णायक ठरतो.

दुसरी महत्वपूर्ण बाब म्हणजे गावातील सामाजिक कार्यकर्ते आदरणीय गुरूनाथअण्णा जगदेव कटारे यांचेही गावातील सामाजिक जडणघडणीत मोलाचे सहकार्य आहे. त्यांनी सन २००४-२०५ या काळात गावात प्रचंड पाणी टंचाई निर्माण झाली असताना संपूर्ण गावाला स्वत:च्या ट्रॅक्टरद्वारा मोफत पाणीपुरवठा केला, त्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे, मा. कृषिमंत्री शरद पवार यांच्याहस्ते त्यांना 'पाणी सम्राट' हा पुरस्कार देऊन विशेष गौरव केला गेला. (२००४-२००५)

तसेच गावातील गोरगरिबांना त्यांच्या मुलामुलींच्या विवाहप्रसंगी आर्थिक मदत करणे, आजारी, गरजू लोकांना उपचारासाठी आर्थिक मदत करणे, गरिबांघरी कोणी व्यक्ती मृत्यू पावल्यास त्यांना उत्तरकार्यासाठी आर्थिक मदत करणे इत्यादी महत्वपूर्ण सामाजिक कार्यास श्री. गुरूनाथअण्णा कटारे हिरीरीने सढळ हाताने मदत करतात. त्यामुळेच २००५ साली झालेल्या कुंभारी ग्रामपंचायत निवडणूकीत गावातील सर्वसामान्य मतदारांनी श्री. गुरूनाथअण्णा कटारे यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलला विजयी केले. याशिवाय कुंभारी ग्रामपंचायतीच्या व्यवस्थापनाबाबत थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेत येईल.

कुंभारी गावाच्या ग्रामपंचायतीच्या व्यवस्थापनासाठी एक ग्रामसेवक व इतर १२ कर्मचारी कार्यरत आहेत. त्याचे विभागवार विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल.

**ग्रामपंचायत व्यवस्थापनासाठी कर्मचारी :**

| अ.क्र. | कर्मचारी पद (हुद्दा) | कर्मचारी संख्या |
|---|---|---|
| १. | लिपिक | २ |
| २. | पाणीपुरवठा कर्मचारी | २ |
| ३. | सुरक्षा कर्मचारी | २ |
| ४. | स्वच्छता कर्मचारी | ५ |
| ५. | शिपाई | १ |
| ६. | कोतवाल | १ |
| ७. | पोलिस पाटील | १ |

याबरोबरच कुंभारी गावासाठी एक तलाठी असून तो महसूल अधिकारी म्हणून कार्य पार पाडतो. तो शेतीसंबंधी सर्व उतारे, शेतसारा, उत्पन्न दाखले, पीकपाणी यांच्या नोंदी इ.

कामे तो पार पाडतो. अशाप्रकारे कुंभारी ग्रामपंचायतीचे प्रशासन असून ते कार्यक्षमपणे कार्य करताना दिसून येते.

**शैक्षणिक माहिती :**

कुंभारी गावाचा शैक्षणिक आलेख खूप चांगला असून गावात एकूण तीन माध्यमांच्या प्राथमिक शाळा आहेत. त्यात प्रामुख्याने जि.प. मराठी (मुले / मुली), कन्नड आणि ऊर्दू यांचा समावेश होतो. म्हणूनच कुंभारी हे महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण असे खेडेगाव आहे की जेथे चार प्रकारच्या प्राथमिक शाळा एकत्र आहेत. या शाळांमध्ये शिक्षक संख्या किती, विद्यार्थी/विद्यार्थीनी संख्या किती, वर्गाची संख्या किती, मुख्याध्यापक कोण आहे, याची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) जि.प. प्रा.मुलांची शाळा, कुंभारी (मुख्याध्यापक – एम.बी. कस्तुरे)**

| अ.क्र. | शिक्षक संख्या | वर्ग | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १. | एकूण शिक्षण १३ | १ ली | ७३ |
| २. | शिक्षक २ | २ री | ६३ |
| ३. | शिक्षिका ११ | ३ री | ६६ |
| ४. | | ४ थी | ५६ |
| ५. | | ५ वी | २१ |
| ६. | | ६ वी | २१ |
| ७. | | ७ वी | २१ |

(संदर्भ : २००७-२००८ हजेरीपत्रक.)

## २) जि.प.प्रा. मुलींची शाळा, कुंभारी (मुख्याध्यापक – एस.जी. कोठाणे)

| अ.क्र. | शिक्षक संख्या | वर्ग | विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | अ.तुकडी | ब. तुकडी |
| १. | एकूण शिक्षक १३ | १ ली | ३४ | ३२ |
| २. | शिक्षक – ३ | २ री | ३० | ३३ |
| ३. | शिक्षिका ३० | ३ री | ३२ | ३२ |
| ४. | | ४ थी | २८ | २७ |
| ५. | | ५ वी | २५ | |
| ६. | | ६ वी | २८ | |
| ७. | | ७ वी | १८ | |

(संदर्भ २००७–२००८ हजेरी पत्रक.)

## जि.प.प्रा. ऊर्दू शाळा, कुंभारी (मुख्याध्यापक – एम.आर. अतावाले)

| अ.क्र. | शिक्षक संख्या | वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण शिक्षक ६ | १ ली | ९ | ८ | १७ |
| २. | शिक्षक २ | २ री | ८ | १६ | २४ |
| ३. | शिक्षिका ४ | ३ री | ७ | १८ | २५ |
| ४. | | ४ थी | ४ | १० | १४ |
| ५. | | ५ वी | ८ | १२ | २० |
| ६. | | ६ वी | १ | १५ | १६ |
| ७. | | ७ वी | ६ | १० | १६ |

(संदर्भ : २००७–२००८ हजेरीपत्रक.)

**जि.प.प्रा. कन्नड शाळा, कुंभारी (मुख्याध्यापक सौ. एम.बी. शिवशरण)**

| अ.क्र. | शिक्षक संख्या | वर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | एकूण शिक्षक ५ | १ ली | ६ | १४ | २० |
| २. | शिक्षक १ | २ री | ११ | १५ | २६ |
| ३. | शिक्षिका ४ | ३ री | ८ | १५ | २३ |
| ४. | | ४ थी | १० | १० | २० |
| ५. | | ५ वी | ६ | १२ | १८ |
| ६. | | ६ वी | ५ | १२ | १७ |
| ७. | | ७ वी | ३ | १२ | १५ |

(संदर्भ : २००७-२००८ हजेरी पत्रक.)

याशिवाय कुंभारी गावामध्ये माध्यमिक शिक्षणासाठी इ.५ वी पासून इ. १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी श्री. गेनसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळ, कुंभारी संचलित श्री. गेनसिद्ध हायस्कूल असून या हायस्कूलची स्थापना गावातील प्रतिष्ठित व्यक्ती संस्थेचे अध्यक्ष श्री. गंगाधर पाटील आणि संस्थेचे सचिव श्री. विश्वनाथ बिराजदार यांनी केली आहे. श्री. गेनसिद्ध हायस्कूलची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :

श्री. गेनसिद्ध हायस्कूल कुंभारी ता.द.जि.सोलापूर, (मुख्याध्यापक सी.एस. आळगुंडगी)

| अ. क्र. | शिक्षक संख्या | वर्ग | विद्यार्थी संख्या | | शिक्षकेतर कर्मचारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | | | |
| | एकूण १७ | ५ वी | ६३ | ४० | लिपीक | प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर | शिपाई |
| १ | शिक्षक १५ | ६ वी | ५८ | ५४ | एकूण २ | सहाय्यक १ | ३ |
| २ | शिक्षिका २ | ७ वी | ७६ | ४० | उरिष्ठ १ | परिचर १ | |
| ३ | | ८ वी | ७१ | ६० | कनिष्ठ १ | | |
| ४ | | ९ वी | ५२ | ५४ | | | |
| ५ | | १० वी | ४५ | २९ | | | |

(संदर्भ : २००७-२००८ हजेरी पत्रक.)

या बरोबरच कुंभारी गावामध्ये एकूण १० अंगणवाड्या आहेत. त्याची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देता येईल.

| अ.नं. | शिक्षिका | मदतनीस | विद्यार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण |
| १. | मिनाक्षी कदम | अनिता गावडे | ११ | ११ | २२ |
| २. | विजू जवळे | मंगल काशेट्टी | २४ | २६ | ४८ |
| ३. | भागीरथी बिराजदार | लक्ष्मी कोरे | ३० | २० | ५० |
| ४. | लता आरोळे | त्र्अनिता पारशेट्टी | २० | २० | ४० |
| ५. | मंगल निकंबे | शांताबाई बनसोडे | २८ | २४ | ५३ |
| ६. | अनिता निकंबे | कुसूम गायकवाड | ३० | ३० | ६० |
| ७. | अनिता तिरशेट्टी | अंबिरमा मुल्ला | २५ | २० | ४५ |
| ८. | बियामा मुजावर | मयत | १८ | २० | ३८ |
| ९. | मिनाक्षी रजपूत | सुरेखा कलशेट्टी | २८ | २२ | ५० |
| १०. | भाग्यश्री जवळे | अंबुबाई तिरशेट्टी | ३२ | २८ | ६० |

(संदर्भ : २००७-०८ हजेरीपत्रक)

वरील प्रमाणे कुंभारी गावाचा शैक्षणिक आढावा घेतला आहे.

**आरोग्य विषयक माहिती :**

कुंभारी गावाच्या आरोग्य सोयी सुविधांचा विचार करता गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी डॉ. अमरचंद शहा यांचे 'प्रगती हॉस्पिटल' असून या ठिकाणी विविध रोग्यांना औपधोपचार केले जातात. तसेच कुंभारी गावासाठी सन २००५-२००६ या वर्षामध्ये दोन शासकीय आरोग्य केंद्राच्या उभारणीस शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. कुंभारी गावासाठी जिल्हा परिषदेतर्फे दोन आरोग्य सेवकांची नियुक्ती केली आहे. ते कुंभारी गावातील वेगवेगळ्या भागात जाऊन लोकांच्या आरोग्याची तपासणी करतात.

सोलापूर जिल्हयाचे खासदार मा. श्री. सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लोकमंगल उद्योगसमूहाच्या वतीने कुंभारी गावामध्ये श्री. गेनसिद्ध देवस्थान मंदिर व कालिकादेवी तलाव यांच्या मधोमध सुमारे २७ एकर जागेपैकी साडेतीन लाख चौरस फूट जागेत सर्व सुविधानीयुक्त पाचशे खाटांचे 'लोकमंगल रूग्णालय व संशोधन केंद्र' उभारण्यात येत असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. सुमारे ५० कोटी रूपयांचा खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पामुळे कुंभारी परिसरातील सुमारे ५ लाख रूग्णांना याचा लाभ होणार आहे.

**सांस्कृतिक माहिती :**

कुंभारी गावामध्ये प्रामुख्याने चार सण किंवा उत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. त्यात गुढीपाडवा, महादेव यात्रा, डॉ. आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती विशेष असून याशिवाय हरजत साचेबिबी ऊरूस आणि राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहाने साजरी केली जाते. या चार महत्वपूर्ण उत्सवापैकी श्री. गेनसिद्ध यात्रा (गुढी पाडवा) ही महत्वपूर्ण असून ही यात्रा जवळपास पाच दिवस चालते. या यात्रेमध्ये आजूबाजूच्या खेडेगावातील सर्वधर्मीय लोक मोठ्या उत्साहाने, भक्तीभावाने सामील होतात. या पाच दिवसांमध्ये वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले असते. त्यात देवाच्या पालखीची मिरवणूक, भक्तीगीतांचा कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम (नाटक), जंगी कुस्ती स्पर्धा (दोन दिवस) व महाप्रसाद वाटप इ. कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

याबरोबरच महादेव यात्रा, हजरत साचेबिबी ऊरूस आणि वेगवेगळ्या महापुरूषांच्या जयंत्या इ. कार्यक्रमांचे नियोजन सातत्याने कुंभारी गावात केले जाते. त्यामुळे गावातील सामाजिक एकोपा टिकून राहण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे.

**औद्योगिक व रोजगार विषयक माहिती :**

कुंभारी गावापासून ५-६ कि.मी. अंतरावर एम.आय.डी.सी. ही औद्योगिक वसाहत असून तेथे प्रामुख्याने टेक्स्टाईल हा प्रमुख उद्योग आहे की, जेथे टॉवेल, चादर, नॅपकीन, इ. वस्तूंचे उत्पादन केले जाते. या उद्योगामुळे कुंभारी गावातील बहुसंख्य लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच कुंभारी गावामध्ये सन १९९२-९३ साली तत्कालीन खासदार श्री. धर्मण्णा सादुल व जनार्दन कारमपुरी यांच्या पुढाकाराने शारदा सहकारी सूत गिरणीची स्थापना झाली. या गिरणीमुळे सुद्धा कुंभारी गावाबरोबरच शेजारच्या अनेक गावातील बेकारांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच कुंभारी गावापासून ५ कि.मी. अंतरावर कुमठे (ता.उ.सोलापूर)येथे श्री. सिद्धेश्वर सह. साखर कारखाना असून या कारखान्यामुळे सुद्धा गावातील अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

याशिवाय गावातील बहुसंख्य लोकांचा शेती हाच व्यवसाय आहे. अशाप्रकारे कुंभारी गावाच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक आणि औद्योगिक / रोजगार विषयक बाबींचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. रणवरे, डी.डी., **'हिस्ट्री ऑफ सोलापूर'**, अभय प्रकाशन, अकलूज- २००१ पृ.क्र. ३.

२) डॉ. गाडगीळ, डी.आर., **'सोलापूर सिटी सोशिओ-इकॉनॉमिक स्टडीज'**, सोलापूर, १९६५ पृ.क्र.२